# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०४/०३/२०२५ (मंगळवार)**

---

## रामटेक उपविभागाअंतर्गत पोलीस स्टेशन रामटेक हद्दीत काढण्यात आली बेटी बचाओ बेटी पढाओ जनजागृती रॅली

बेटी बचाओ बेटी पढाओ या उपक्रमाला १० वर्षे पुर्ण झाल्याने मा. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रमीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात रामटेक उपविभागात दिनांक ०३/०३/२०२५ रोजी रामटेक येथे बेटी बचाओ बेटी पढाओ जनजागृती रॅली काढण्यात आली होती. सदर रॅली श्री रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या नेतृत्वात काढण्यात आली असुन सदर रॅली मध्ये श्री आसाराम शेटे, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन रामटेक, श्रीमती धनश्री कुटेमाटे, सपोनि दामिनी पथक, उपविभाग रामटेक, रामटेक पोलीस स्टेशन चे अधिकारी आणि अंमलदार तसेच पोलीस स्टेशन अरोली, देवलापार, पारशिवणी येथील महीला अंमलदार , महीला होमगार्ड सैनिक, शाळकरी विदयार्थिनी, महीला पोलीस पाटील, महीला समुपदेशक आणि इतर महीलांचा सहभाग होत्या. सदर रॅली उपविभागिय पोलीस अधिकारी कार्यालय येथुन सुरू झाली तसेच रामटेक शहरातुन जनजागृती करत रॅली पोलीस स्टेशन रामटेक येथे समाप्त करण्यात आली. तसेच मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या १०० दिवसांच्या उपक्रमांअंतर्गत पोलीस स्टेशन रामटेक येथे सुरू करण्यात आले पिडीत महीलांसाठी **पोलीस सहायता, कायदेशिर सहायता , वैदयकीय सहायता, आपातकालीन सहायते साठी वन स्टॉप सेंटर सुरू करण्यात आलेले आहे.**


पोलीस स्टेशन अरोली
आधार करतील
गर्भलिंग तपासणी
पोलीस स्टेशन पारशिवनी
नागपूर ग्रामिण पोलीस
बेटी बचाओ बेटी पढाओ
केवल एक नारा नही
बल्की समाज
को बदलने
का एक प्रयास है!
बेटा बेटी दोनो
एक समान
यह तो है
आपकी शान
सबको चुकाना होगा,
इसे रोकना है तो
हमको आगे आना होगा

